**पोलीस अधीक्षक कार्यालय, रायगड-अलिबाग**
**टिळक रोड, हिराकोट तलावाशेजारी, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड**
दुरध्वनी क्र.०२१४१-२२२०२८/२२८४७३ फॅक्स क्र.०२१४१-२२८७८९,
ई-मेल- sp.raigad@mahapolice.gov.in

**क्रमांक:१७६/आस्था-प्रलि/पो.भ.-२०१९/२०२०** — **अलिबाग. दि.२५.१०.२०२१**

**विषय :-** रायगड जिल्हयाकरीता पोलीस शिपाई या संवर्गात N.T.-D (भ.ज.-ड) या प्रवर्गासाठी पदे नसतांना आपण Application Category ही N.T.-D (भ.ज.-ड) यामधुन अर्ज भरलेला असलेबाबत.

* * * * *

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, रायगड जिल्हा पोलीस शिपाई-२०१९ भरतीच्या अनुषंगाने प्रसिध्द करण्यांत आलेल्या जाहिरातीमध्ये रायगड जिल्हयाकरीता पोलीस शिपाई या संवर्गात N.T.-D (भ.ज.-ड) या प्रवर्गासाठी रिक्त पदे नसतांनाही आपण भ.ज.-ड या प्रवर्गातून (Application Category N.T.-D) असे नमूद करुन ऑनलाईन अर्ज केलेला असल्याची बाब उमेदवारांची लेखी परिक्षेमध्ये मिळालेल्या गुणांची यादी तयार करतेवेळी निर्दशनास आलेली आहे.

दि.०३.०९.२०१९ रोजी पोलीस शिपाई पदाच्या जाहिरातीमधील परि.क्र.०४ मध्ये " उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक प्रमाणपत्रे/कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. त्यामुळे ऑनलाईन अर्जाची माहिती उमेदवारांनी जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी, शैक्षणिक अर्हता व **मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच भरावी. ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण, अचूक व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवाराची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.** ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती अर्ज सादर केल्यानंतर बदलता येणार नाही " अशा सुचना देण्यांत आलेल्या आहेत.

रायगड जिल्हयाकरीता पोलीस शिपाई या संवर्गात N.T.-D (भ.ज.-ड) या प्रवर्गासाठी पदे नसतांना आपण Application Category ही N.T.-D (भ.ज.-ड) यामधुन अर्ज भरलेला आहे. त्यामुळे **N.T.-D (भ.ज.-ड) या प्रवर्गासाठी पदे नसल्याने रायगड जिल्हा पोलीस भरती निवड मंडळाच्या सर्वानुमते आपला पुढील भरती प्रक्रियेसाठी विचार करण्यांत आलेला नाही.**

**आपला विश्वासू,**

25/10

**( अशोक दुधे )**
**पोलीस अधीक्षक, रायगड-अलिबाग**

**प्रति,**

**सोबत जोडलेल्या यादीतील N.T.-D (भ.ज.-ड) या प्रवर्गातील ०७ उमेदवार**

| Sr.No | Roll No | Set | Category |
|---|---|---|---|
| 1 | 5467223144 | D | NT-D |
| 2 | 5467223209 | B | NT-D |
| 3 | 5467226480 | D | NT-D |
| 4 | 5467226573 | A | NT-D |
| 5 | 5467227784 | D | NT-D |
| 6 | 5467229159 | D | NT-D |
| 7 | 5467230211 | A | NT-D |